**रेफ आय टी ८/२००९**

सरतपास नि. यु — ३१८

<u>साक्षीदाराचे नाव : श्रीमती कौशल्या अशोक डोंगरे शपथेवर उलटतपास</u>
<u>श्री जे बी शालीग्राम वकिल प्रथम पक्षकार तर्फे उलटतपास</u>

१५. मी प्रथम पक्षकार यांच्याकडे नोकरीसाठी अर्ज दिला नव्हता. त्यांच्या नोकरीबाबत काय नियम आहे याच्याबाबत मला माहित नाही. हे खरे की नोकरीतून कमी करण्यासाठी कोणताही लेखी आदेश मला प्रथम पक्षकार यांनी दिलेला नाही. मी प्रथम पक्षकार यांच्याकडे कधीही लेखी चौकशी केली नाही की इतर कामगारप्रमाणे मला पगार व सवलती मिळत नाही.

१६. मी द्वितीय पक्षकार यांचे सभासद असल्याबद्यल कोणताही पुरावा याकामी हजर केलेला नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की संघटनेने दाखल केला आहे. स्वच्छतागृहांची उपलब्धता करून घेण्याची जबाबदारी महानगरपालीकेची आहे किंवा कसे याबाबत मी चौकशी केली नाही.

१७. मी ठेकेदार मार्फत प्रथम पक्षकार यांच्यासाठी कामास होते किंवा कसे हे मला माहित नाही. मला नगरपालीकेच्या मुकादमाने पगार दिला. हे खरे की जी व्यक्ती मला पगार देत होती त्यांचा महानगरपालिकेशी काय संबंध होता हे मला सांगता येणार नाही. हे खरे की आमच्या संघटनेने आमच्या नोकरीबाबत नामदार उच्च न्यायालय व सर्वोच न्यायालय येथे केसेस केले होते. त्या केसेस मध्ये आम्हास कामास घ्या असा निकाल लागला. त्या निकालाच्या प्रती माझयाकडे नाही. मी महानगरपालीका यांच्याकडे नोकरी करत असल्याबद्यल न्यायालयाकडे पुरावा दाखल केलेला नाही. द्वितीय पक्षकार व त्यांचे पदाधिकारी यांना आमचे तर्फे ही केस

चालवण्याचा अधिकार आम्ही दिला याबद्यल कोणताही पुरावा मी दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की संघटनेने दाखल केलेला आहे. हे खरे नाही की मी प्रथम पक्षकार किंवा त्यांच्या अधिकारी यांचे कोणतेही काम केलेले नाही. हे खरे की मी माझ्या सरतपासातील मजकूर वाचलेला नाही. हे खरे नाही की मी खोटी साक्षी देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास काही नाही

सही

( पि. रा. भावके—पाटील )

पुणे
दिनांक : २४/७/२०१८

सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे